# वैदिक संस्कृती ( इ. स. पू. 1500 ते इ. स. पू. 500)

भारतातील वेदिक संस्कृतीचे निर्माते आर्य होते. त्यांची भाषा संस्कृत होती.

**आर्यांचे मूळस्थान**

1) मध्य आशियातील आर्य : जर्मन अभ्यासक मॅक्समुलर व श्वेगेल .
2) दक्षिण आशिया : प्रा. मायर्स व प्रा. चाइल्ड : दक्षिण रशिया .
3) डॅन्यूब चे खोरे : गाईल्स .
4) उत्तर ध्रुव : लोकमान्य टिळक . ( द आर्टिक होम ऑफ द आर्यन्स)
5) सप्तसिंधू प्रदेश : संपूर्णानंद , लक्ष्मीधर उल्ला, गंगानाथ झा.
6) तिबेट : पार्जिटर

नवीन पुरावा: जर्मन संशोधकांना आशिया मायनर मधील बोगाझकायी येथे आऱ्यांच्या संदर्भात एक शिलालेख सापडला. त्याचा काळ इ. स. पू. 1380 असावा.

**आर्य भारतात येण्याची कारणे**

- महत्वाकांक्षी , धाडसी, धिप्पाड.
- सुपीक जमिनीची गरज
- लोकसंख्येची वाढ
- गवताळ क्षेत्राच्या शोधात.
- हवामानातील परिवर्तनामुळे
- नवीन भूमी पाहण्याची लालसा.

**भारतीय विस्ताराचे कालखंड :**

- इराणमधील वास्तव्यानंतर खैबर खिंडीतून भारतात.
- ऋग्वेद काळात सप्तसिंधू च्या भूमीवर वास्तव्य .
- कुका ( काबुल ), सुवास्तू ( स्वात) .
- सिंधु व उपनद्या :
  1) वितस्ता ( झेलम ) 2) असिकीनी ( चिनाब ) 3) पुरुष्णी ( रावी ) , 4) विपाशा ( बियास ) 5) शतद्रू ( सतलज ) व सप्तजी ( सरस्वती)

वेदांच्या निर्मितीचा कालखंड म्हणून वैदिक संस्कृती. वेद हे जगातील प्राचीन वाङमय .

**वेद अर्थ व व्याप्ती :**

विद म्हणजे जाणणे . वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा होतो. वेद अपौरुषेय ही वैदिक आर्यांची विचारधारा . चारही वेदांचे संधीयुक्त पाठ म्हणजे संहिता. त्यात चार वेद. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, आणि अथर्ववेद .

**ऋग्वेद**

हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येतेहा वेद ब्रह्मदेवाने लिहिला आहे, अशी समजूत आहे. ब्रह्मदेव निद्रेत असताना त्यांच्या तोंडातून तीन वेद निघाले.त्यापैकी एक म्हणजे ऋग्वेद.

- ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे.
- ऋग्वेदामध्ये एकूण १० मंडले व १०२८ सूक्ते आहेत.
- निसर्गातील विविध शक्तींना देवता मानले आहे.
- त्यांची स्तुती गाणारी कवने ऋग्वेदात आहे. ऋग्वेदातील प्रत्येक कडव्यास 'ऋचा' म्हणतात. ऋच् धातूचा अर्थ पूजा करणे असा आहे. यावरून ऋचा या शब्दाचा अर्थ स्तुतिपर कविता असा होतो.

- ऋग्वेद रचनेचा काल इ.स.पू. ६००० पूर्वीच्या सुमाराचा असावा असा अंदाज आहे.
- ऋग्वेदाच्या मांडणीची व्यवस्था महर्षी व्यास यांनी पाहिली.

ऋग्वेदातीला सूक्तांचे कर्ते ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीनही वर्णांचे लोक आहेत.. 'अग्निमीळे पुरोहितम्' हा ऋग्वेदातील पहिला मंत्र असून अग्निसूक्ताने ऋग्वेदाचा प्रारंभ होतो.

ऋग्वेद हा स्तुतिपर असून पद्यमय आहे. ऋग्वेदाच्या १०व्या मंडलातल्या पुरुषसूक्तात तीनही वेदांचा उल्लेख आहे. श्रीसूक्त हे देवीच्या वर्णनपर असलेले प्रसिद्ध सूक्त ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात आहे.

वेद शब्दामध्ये विद् असा धातू आहे, त्याचा अर्थ ज्ञान असा होतो. अशा १०/२० ऋचांचे एक पद म्हणजे एक **सूक्त**. अशा १०/२० सूक्तांचे एक **अनुवाक्** व अनेक अनुवाकांचे एक **मंडल**. अशी दहा मंडले ऋग्वेदात आहेत. ऋग्वेदातील मंत्र हे अतिशक्करी, अनुष्टुभ, गायत्री, जगती, द्विपदाविराज, पंक्ति, अशा विविध छंदांत रचलेले आहेत.

देवता- ऋग्वेदात अग्नी, अश्विनीकुमार, इंद्र, उषा, द्यावापृथिवी, मरुत, मित्रावरुण, पूषा, ब्रह्मणस्पती, वरुण, सूर्य, अशा विविध देवतांवरच्या सूक्तांची रचना दिसते.

## शाखा

ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. तथापि आज शाकल ही एकमेव शाखा उपलब्ध आहे. ऋग्वेदाच्या आश्वलायन, बाष्कल, मांडूकेय, शाकल व शांखायन अशा पांच प्रमुख शाखा होत्या परंतु त्या लुप्त होऊन आता शाकल ही एकच शाखा शिल्लक आहे.
ऋग्वेदात एकूण १०२८ सूक्ते आहेत. पहिल्या व दहाव्या मंडलात समानच म्हणजे १९१ सूक्ते आहेत.
चार सुक्ते : १) ऋषिसूक्त २) देवतासुक्त ३) अर्थ सूक्त ४) छंदसूक्त
ऋग्वेदात एकूण अक्षरांची संख्या ४३२००० आहे.

ऋग्वेद मंडलानुसार कवी

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम मण्डल | अनेक ऋषि | षष्ठम मण्डल | भारद्वाज |
| द्वितीय मण्डल | गृत्समद | सप्तम मण्डल | वसिष्ठ |
| तृतीय मण्डल | विश्वामित्र | अष्ठम मण्डल | कण्व व अंगिरा |
| चतुर्थ मण्डल | वामदेव | नवम मण्डल (पवमान मण्डल) | अनेक ऋषि |
| पंचम मण्डल | अत्रि | दशम मण्डल | अनेक ऋषि |

## यजुर्वेद

या शब्दाचा अर्थ (संस्कृत:- यजुस् + वेदः = यजुर्वेदः) असा होतो. हा हिंदुंच्या चार वेदांपैकी दुसरा वेद आहे.. या वेदाला अध्वर्यू वेद असेही म्हणतात. यजुर्वेद संहितेत वैदिक काळातील यज्ञात आहुती देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मंत्रांचा समावेश आहे. यज्ञसंस्थेचा तपशीलवार विचार या संहितेने मांडला आहे. धनुर्वेद हा यजुर्वेदाचा उपवेद मानला जातो.

यजुर्वेदाच्या प्राथमिक अशा दोन संहिता आहेत - शुक्ल संहिता व कृष्ण संहिता.दोहोंमध्येही धार्मिक अनुष्ठान करावयासाठीचे मंत्र आहेत. कृष्ण यजुर्वेदाच्या संहितेतच ब्राह्मणग्रंथातील गद्य भाग दिले आहेत, तर शुक्ल यजुर्वेदासाठी ते शतपथ ब्राह्मणात स्वतंत्रपणे दिले आहेत. शतपथ ब्राह्मण हा शुक्ल यजुर्वेदाचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ होय. याज्ञवल्क्यशिक्षा हा ग्रंथ या वेदाच्या पठणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

- ### शुक्ल यजुर्वेद

शुक्ल यजुर्वेदाच्या 'वाजसनेयी संहिता' म्हणून नाव असलेल्या (आणि बरेच साम्य असलेल्या)दोन शाखा आहेत.

- वाजसनेयी माध्यंदिन - मुळची बिहार येथील
- वाजसनेयी कण्व- मुळची, कोशल येथील

वाजसनेयी माध्यंदिन ही शाखा उत्तर भारत , गुजरात , महाराष्ट्रातील नाशिकच्या उत्तरेकडील भागात प्रसिद्ध आहे. तर, काण्व ही शाखा नाशिकच्या दक्षिणेकडीलओडिशा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू या भागांत प्रसिद्ध आहे..

## कृष्ण यजुर्वेद

कृष्ण यजुर्वेदाच्या चार शाखा आहेत.

- तैत्तिरीय संहिता - मुळची, पांचालची
- मैत्रयणी संहिता – मुळची कुरुक्षेत्राच्या दक्षिणेकडील भागातली
- चरक कथा संहिता - मुळची, मद्र व कुरुक्षेत्र प्रांतातली
- कपिष्ठल कथा संहिता - बाहिका, दक्षिण पंजाबातील

## सामवेद

हा प्राचीन हिंदू संस्कृतीतील चार वेदांपैकी तिसऱ्या क्रमांकाचा वेद आहे. साम म्हणजे 'गायन' आणि वेद म्हणजे 'ज्ञान' होय.हा वेद ब्रह्मदेवाने लिहिला आहे, असे मानले जाते..

## साम शब्दाचा अर्थ

साम शब्दाचा पहिला अर्थ प्रिय किंवा प्रियकर वचन असा आहे. कुठे कुठे गान या अर्थानेही तो प्रयुक्त आहे.

## स्वरूप

सामवेदात ऋग्वेदातील ऋचांचे गायन कसे करावे याचे विवेचन आहे. एकंदर 1810 ऋचा आहेत. परंतु फक्त 75 सुकते स्वतंत्र आहेत . बाकीची सर्व ऋग्वेदातून घेतली आहेत. सामवेदाला भारतीय संगीताचा पाया म्हटले जाते. यातील ७५ ऋचा ऋग्वेदाच्या शाकल शाखेतून घेतल्या, तर इतर ७५ या बाष्कल शाखेमध्ये मोडतात. या ऋचांचे गायन-सामगान हे सुचवलेल्या विशिष्ट सुरांमध्ये गायले जाते. सामगान गाऊन विशिष्ट विधी करतांना विविध देवतांना प्रसाद पेयार्पण म्हणून दूध व इतर पदार्थांबरोबर सोम वनस्पतीचा रस अर्पिला जाई.

सामवेदातील काही ऋचा या इ.स.पू. १७०० च्या आधी (ऋग्वेदाच्या कालखंडात) रचल्या असल्या पाहिजेत असे मानले जाते.

गंधर्ववेद हा सामवेदाचा उपवेद आहे.

## अथर्ववेद

हा चार प्रमुख वेदांपैकी एक आहे. हा ग्रंथ चार वेदांपैकी सगळ्यात शेवटी लिहिला गेल्याचे मानले जाते. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेद आहे.आयुर्वेद हा विष्णु अवतार धन्वंतरी यांनी आयुर्वेदाची रचना केली. अथर्ववेदात तत्त्वज्ञानाबरोबर जीवनातील अडचणी, औषधी वनस्पती आणि संकटांवरील उपायांचीही माहिती आहे. समाजातील सर्व थरांमध्ये, तसेच भारतातील सर्व धर्मांमध्ये अथर्ववेदीय उपासनांचा प्रचार आजही दिसतो.

## निर्माण

हा वेद ऋषी अथर्व यांनी लिहीला आहे. हा वेद सोडून सर्व वेद ब्रह्मदेवाने त्यांच्या मुखातून सांगून लिहीले आहे. याला शंकरदेवाने चौथ्या वेदाच्या रुपात मान्यता दिली.

## प्रस्तावना

भारतीय संस्कृती-इतिहासात चतुर्थ वेद म्हणून मान्यता पावलेला,परंतु परंपरागत ब्राह्मण वर्गाने वेद त्रयीमध्ये समावेश करण्यास नाकारलेला अथर्ववेद, यज्ञीय धर्मसाधनेच्या दृष्टीने ऋग्वेदाहून कमी महत्त्वाचा असला, तरी भारतीय लोकसाहित्याचा आद्य स्रोत या दृष्टीने सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या तो ऋग्वेदाहूनही अधिक महत्त्वाचा आहे. सर्वंकष समाजाभिमुखता हे अथर्व वेदाचे प्रमुख वैशिष्ट्य असून, समाजातील निष्कांचन ग्रामीण जनतेपासून उच्चपदस्थ राजा-महाराजांपर्यंतच्या समस्त वर्गांचा परामर्श या ग्रंथात आढळतो.

## अथर्ववेदाची नावे

अथर्ववेद हा अथर्वन आणि अंगिरस या दोन ऋषि समूहांनी रचला म्हणून यास अथर्वांगिरस असे एक प्राचीन नाव आहे. वैदिक गोपथ ब्राम्हणाच्या लेखनकाळाच्या

अथर्ववेदाच्या नऊ शाखा सांगितल्या अहेत.

1. पैपलाद (याचा प्रसार नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशात झाला)
2. स्तौद
3. मौद
4. शौनकीय (याचा प्रसार नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशात झाला)
5. जाजल
6. जलद
7. कुन्तप
8. ब्रह्मावद
9. देवदर्श
10. करणवैद

ब्राह्मणग्रंथ : आध्यात्मिक गद्य रूपातील ग्रंथ .वेदांचे स्पष्टीकरण यातून केले आहे.
त्यांच्या विषयाचे तीन गट होतात.

1) विधी म्हणजे संज्ञा संबंधी प्रयोगात्मक नियम.
2) अर्थवाद म्हणजे मुख्य मुद्द्यांचे विवरण.
3) उपनिषदे म्हणजे टिकात्मक विचार.

आरण्यके: अरण्यात जाऊन रचलेले ग्रंथ . यज्ञ विधी करताना कोणत्याही प्रकारची चूक होऊ नये यासाठी एकांतवासात चिंतन व अभ्यास. हा भाग वेदान्त म्हणूनही ओळखला जातो.

उपनिषदे: उपनिषद म्हणजे गुरु जवळ बसून मिळवलेले ज्ञान . यांची संख्या 108 आहे. इ. स. पू 800 ते इ. स. पू 500 हा रचनेचा काल.

वेदांगे:

वेदांचा अर्थ नीट समजून येण्यासाठी वेदांगांची निर्मिती.

सहा वेदांगे

1) शिक्षण ( शिक्षासूत्र ) – वैदिक मंत्राच्या उच्चाराचे वर्णन

2) कल्पसूत्र – ( कल्प) – यज्ञाचे नियम व आचरण
याचे चार विभाग – 1) श्रोतसूत्र 2) गृहसूत्र 3) धर्मसूत्र 4) शुल्बसूत्र

3) निरुक्त- ( निरुक्तसूत्र ) – वैदिक शब्दांची उत्पत्ति व अर्थ .

4) व्याकरण ( व्याकरण सूत्र) – व्याकरण शास्त्राचे वर्णन.

5) छंद ( छंदसूत्र ) - वैदिक मंत्राचे तालासुरत उच्चारण करणे.

6) ज्योतिष – ( ज्योतिष सूत्र ) ब्रह्मांड व सूर्य मंडळाचे वर्णन .

*वेदातील कठीण शब्दाचा अर्थ सांगणारा निघंटू नावाचा शब्दकोश काश्यपहरींनी तयार केला*

उपवेद : संख्या सहा .

1) आयुर्वेद – रोगनिदान वनौषधी.
2) धनूर्विद्या
3) गंधर्व – गायन व वादन
4) स्थापत्य – बांधकाम
5) कला - विविध कला
6) अर्थशात्र

षडदर्शन

वेदांच्या सत्य तत्वज्ञानाचे दर्शन घडवण्यासाठी सहा दर्शने लिहिली गेली.

- योग दर्शन : पतंजली. – आत्मज्ञनासाठी सांगीतलेली साधना
- न्यायदर्शन : गौतम – तर्कनिष्ठ न्यायचे विवरण , प्रत्यक्ष अनुमान, उपमान व वश या मार्गानी ज्ञानप्राप्ती.
- सांख्यदर्शन : कपिल – वेदप्रामाण्य नाकारले.
- वैशेषिक दर्शन : कनाद मुनि. – अनुवाद वर्णन
- पूर्व मीमांसा दर्शन : जैमिनी – वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन

प्राचीन भारतातील पुराणे. 18

1) ब्रह्म पुराण 2) पद्म पुराण 3) विष्णु पुराण 4) भागवत पुराण 5) नारद पुराण 6) वायु पुराण 7) मार्कंडेय पुराण 8) अग्नि पुराण 9) भविष्य पुराण 10) ब्राहमवर्त पुराण 11) लिंग पुराण 12) वराह पुराण 13) स्कंद पुराण 14) वामन पुराण 15) कूर्म पुराण 16) मत्स्य पुराण 17) गरुड पुराण 18) ब्रह्मांड पुराण

## वैदिक कालीन राज्यव्यवस्था :

- वैदिक कालीन राज्यव्यवस्था एक प्रकारे ग्रामीण व्यवस्थेची होती. आर्यांच्या टोळ्या असत त्यांना जन म्हणत.

**राजा किंवा राजन :** राजा हा राज्याचा प्रमुख असून प्रजेचे रक्षण करणे ही त्याची प्रमुख जबाबदारी असेराज्याचा कारभार . चालविण्याकरीता त्यास पूरोहित ( धार्मिक कामे ) , सेनापती( सैन्याचा प्रमुख) आणि कर गोळा करणारा भागदुध मदत करीत असे. वेदकाळात प्रत्ये क ग्रामवसाहतीचा एक प्रमुखअसे. त्याल ा 'ग्रामणी' असे म्हणत. अनेकग्रामवसाहतींचा समूह म्हणजे 'वि श्'. त्या च्याप्रमुखाला 'विश्पति ' असे म्हणत. अनेक 'वि श्' मि ळून'जन' तयार होत असे. पुढे जन जेव्हा एखाद्याविशिष्ट प्रदेशात स्थि रावले,तेव्हा त्या प्रदेशाला 'जनपद' म्हटले गेले. 'जन'च्या प्रमुखाला 'नृप' कि वा 'राजा' म्हटले जाई. प्रजेचे रक्षण करणे, कर गोळा करणे आणि उत्तम राज्यकारभार करणे ही राजाची कर्त व्ये होती. राजाला मार्ग दर्श न करण्या साठी 'सभा','समि ती', 'वि दथ' आणि 'जन' अशा चार संस्था होत्या . त्यां मध्ये राज्या तील लोक सहभागी होत. 'सभा'आणि 'वि दथ' या संस्थां च्या कामकाजात स्त्रिय चाहीसहभाग असे. राज्या तील ज्ये ष्ठ व्यक्तींच्या मंडळास'सभा' म्हणत तर लोकांच्या सर्वसाधारण बैठकीस 'समिती' असे म्हणत. समि तीमध्ये लोकांचा सहभाग असे. ती सभे पेक्षा मोठी .

**मंत्रिमंडळची पदे व कर्तव्ये**

1) राजन्य: या पदावर राजपुत्र , सरदार, यापैकी क्षत्रीय व्यक्ती.
2) महिषी : पट्टराणी ला हे पद.
3) पूरोहित : राजाचा धर्म प्रमुख.
4) सेनानी : सैनी प्रमुख
5) सूत : राजाचे खाजगी अधिकारी व सारथी
6) संग्रहीत: अर्थ व्यवहार सांभाळणारा कोशाध्यक्ष .
7) भागदुग : हा कर वसूल करणारा.
8) अवक्षप : हा अधिकारी जुगार निरीक्षक व नियंत्रक

## इतर शासन व्यवस्था :

- **ग्रामणी :** गावाच्या प्रमुखास ग्रामणी असे म्हटले जात असे व ग्रामवादी हा ग्रामणीच्या मदतीने गावाची न्यायविषयक जाबबदारी सांभाळत असे.
- **विशपती :** गावाच्या समूहाला विश आणि त्याच्या प्रमुखास विश्पती म्हटले जात असे.

## दैनंदिन जीवनप्रणाली :

**अन्न :** वैदिक काळातील लोकांच्या आहारात दूध व दुधापासून बनलेल्या पदार्थाचा वापर असे ,त्याचबरोबर मां . फळे, तांदूळ आणि सातू इत्यादी धान्याचा उपयोग होत असे.शेळ्या मेनढ्यांचे मांस खाल्ले जाई. गाईचे मांस खाल्ले जात नव्हते. गाईला पवित्र मानले जाई. तिला अघ्न्य म्हणजे कत्तल करण्यासाठी नाही असे मानले जाई. वैदिक वाङ्मयात 'यव', 'गोधूम', 'व्रीहि ' यांसारखे शब्दआढळतात. यव म्हणजे सातू (बार्ली ). गोधूम म्हणजे गहू. व्रीही म्हणजे तांदूळ. अन्न शिजवण्यासाठी ' पचन' व पाणी पिण्याच्या भांड्याला पात्र म्हणत.

- **वस्त्र व प्रावरणे :** वैदिक काळातील लोक स्तुती आणि लोकरीच्या कापडाचा वापर करीत असे.वस्त्रे तीन भागात – 1) नीवी किंवा धोती 2) वसा किंवा शर्ट 3) अधिवसा म्हणजे फेटा किंवा मुंडसे किंवा शाल
- **घरे :** वैदिक संस्कृती ही ग्रामीण संस्कृती होतीआर् .य लोक झोपडी वजा मातीच्या घरात राहत असे.
- **अलंकार :** वैदिक काळातील लोक फुलांच्या माळा, सोन्याचे दागिने, वेगवेगळ्या प्रकारचे मणी व त्यांच्या माळा अलंकार म्हणून वापरीत असे.निष्क हा त्यांचा आवडता दागिना होता .
- **मनोरंजन :** घोड्यांची शर्यत, रथांची शर्यत, नृत्य, संगीत( विना, वना म्हणजे बासरी आणि धुंधुबी म्हणजे ढोल )

**वैदिक कालीन सामाजिक व्यवस्था :**

- **वर्णव्यवस्था :** वर्णव्यवस्था ही भारतीय जाती व्यवस्थेचा उगमस्थान आहेसुरुवातीच्या काळात व्यवसायावरून ब्राम्हण ., क्षत्रीय, वैश्य व शूद्र असे वर्ण निर्माण झाले .
- शूद्र हा अनार्याचा वर्ण ठरला होता. पहिल्या तीन वर्णात रोटी बेटी व्यवहार शूद्र वरणात फक्त रोटी व्यवहार.
- वर्णव्यवस्थेचा उल्लेख पुरुष सुक्तामध्ये सापडतो. उत्तर वैदिक काळात वर्णव्यवस्था संपुष्टात येवून जन्मावरून जात ठरू लागली.

  - ब्राह्मण : धार्मिक काम
  - क्षत्रिय : सैनिकी काम
  - वैश्य : व्यापार- करदाता
  - शूद्र : सेवाकर्म

- **कुटुंबव्यवस्था :** भारतात पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा जन्म वैदिक काळामध्ये. दंपती म्हणजे पती व पत्नी .नना व तत ही आई बापांना लावण्यात येणारी लाडकी नावे. घरचा प्रमुख वयस्क पुरुष होता त्याला गृहपती म्हणत.
- **स्त्रीयांचे स्थान :** स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान असले तरी स्त्रियांना वेदाभ्यास करण्याचा अधिकार होता. पडदा पद्धती नव्हती. त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. स्वत: चा पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विधवा पुनर्विवाह करू शकत होत्या . बालविवाह प्रथा नव्हती. विश्वश्वरा, घोषा, उपाला यांनी ऋग्वेदातील मंत्रांची निर्मिती केली. गार्गी, लोपमुद्रा व मेत्रेयी या विद्वान स्त्रियांचा उल्लेख वैदिक काळातील वाड्मयात आढळतो.नंतरच्या काळात स्त्रियांवर कडक बंधने लादली गेली .

- **विवाह पद्धती: एक पत्नीत्व व बहू पत्नीत्व( राजे महाराजे यांच्यात ) असे दोन प्रकार**
  - ❖ ब्राह्मण : एकाच वर्णात मुलीने हुंडा देऊन
  - ❖ दैव : बाप आपल्या मुलीला दक्षिणेच्या रूपाने पुजाऱ्याला देई.
  - ❖ आर्स : हुंड्याच्या रूपाने मुलीला बैल आणि गाय दिली जाई.
  - ❖ प्रजापती: हुंड्या शिवाय लग्न
  - ❖ गंधर्व : प्रेम विवाह
  - ❖ असुर : पळवून नेऊन विवाह.
  - ❖ राक्षस : पकडून नेऊन विवाह लावणे.
  - ❖ पिशाच्च : विनयभंग

## आश्रमव्यवस्था

- : जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या काळात मानवाला जीवनाचे शंभर वर्षे आयुष्य कल्पून त्याचे चार भागात विभाजन करण्यात आलेही जीवनाची आखणी म .या प्रत्येक भागाला खालीलप्रमाणे कर्तव्य सोपविण्यात आले .ह्णजे आश्रमव्यवस्था होय.
- **ब्रम्हचर्याश्रम** : आयुष्याच्या पहिल्या भागात व्यक्तीकडे गुरूच्या सानिध्यात अभ्यास करून ज्ञान ग्रहण करून विद्या संपादन करण्याचे कर्तव्य त्याच्यावर सोपविण्यात आले.
- **गृहस्थाश्रम :** या काळात व्यक्तीने विवाह करून त्याचेकडे कुटुंबाचे पालन व पोषण करण्याची आणि आपली संसारीक जाबाबदारी पार पाडण्याचे कर्तव्य त्याच्यावर सोपविण्यात आले आहे.
- **वानप्रस्थाश्रम** या काळात व्यक्तीने आपल्या मुलांकडे जबाबदारी सोपवून संसाराच्या सर्व कर्तव्यातून मुक्त होणे : .म्हणजे वानप्रस्थाश्रम होय
- **संन्यासाश्रम :** यात व्यक्तीने वनात जावून ईश्वर चिंतनात आपला उर्वरित काळ कंठावा असे मानले जाई.

## धार्मिक संकल्पना :

- वैदिक काळातील लोक निसर्गपूजक होते.
- सूर्य, वारा व पानी या शक्ति प्रसन्न राहाव्यात म्हणून आर्य लोक त्यांची प्रार्थना करीत असेअशा देवतांना नैवैद्य प्रदान . करण्यातयेत असे आणि हा नैवैद्य शक्तिपर्यंत पोहचविण्याचे कार्य अग्नी करतो अशी त्याची संकल्पना होती.अग्नीस प्रसन्न करण्याकरीता यज्ञ ही संकल्पना उदयास आली. वेदकालीनलोक अग्नीमध्ये विवि ध पदार्थ अर्पण करत. त्याल 'हवी' असे म्हणत. अशा तऱ्हे ने अग्नीमध्ये 'हवी'अर्पण करण्या चा वि धी म्हणजे यज्ञ.
- देवांची संख्या जास्त होती. ती 33 इतकी असावी. विशेष करून पुरुष देवता होत्या.
- महत्वाचे देव. 1) इंद्र : पाऊस आणि वीजांचा देव . घोडा हे इंद्रचे प्रतीक
  2) अग्नि : पुजाऱ्यांचा देव. अग्नीचे मूल ठिकाण स्वर्ग. संत मातृश्वान याने अग्नीला पृथ्वीवर आणले.
  3) वरुण : पाऊस
  4) सोम : सोमरस चा देव. चूल, चंद्र, औषध आणि झाडे यांचा देव. उल्लेख – ऋग्वेदाच्या नवव्या मंडलात.
  5) मित्र: नवस पूर्ण करणारा देव.
  6) यम : मृत्यू देव.
  7) आश्विन : नवरी ला नवरदेव शोधणे. अपंगाला कृत्रिम पाय देणे, जहाजाला फुटण्यापासून वाचवणे.
  8) रुद्र : रास्ते, गुराखी, जनावरे यांची काळजी घेणारा देव.
  9) सावित्री : गायत्री मंत्र या देवासाठी( गायत्री मंत्र विश्वामित्राने रचला.) . हा पुरुष देव होता
  10) विष्णु : तीन अवतार असलेला
  11) देवी: सरस्वती, पृथ्वी, निशा, अदिति, उषा, अरण्ययी

पृथ्वीवरील देव :
अग्नि , पृथ्वी, सरस्वती, सोम

हवेतील देव :
रुद्र , वायु, मरुत, इंद्र, पर्जन्य, अहिरबद्धन्य

अवकाशातील देव
वरुण , सूर्य, आश्विन, उरुक्रम, मित्र, पुशन, सावित्री, विष्णु व उषा

- **सोळा संस्कार:**
  माणसाला पुरणातवाकडे नेण्यासाठी संस्कारांची गरज आहे अशी कल्पना. संस्कार करण्याचा अधिकार फक्त द्विज म्हणजेच ब्राह्मण , क्षत्रीय व वैश्य यांना . यामुळे ब्राहमनांचे महत्व वाढले.
  1) गर्भदान 2) पुम्सवाना ( मुलगा जन्माला यावा म्हणून ) 3) सिमन्तोन्नयन ( गर्भ धारणा व्हावी म्हणून) 4) जातकर्म 5) नामकरण 6) निश्क्रमन ( नवजात बालकाला प्रथमच घराबाहेर काढणे. ) 7) अन्न प्राशन 8) कर्ण वेध ( कान टोचणे.) 9) चूडाकर्म ( मुंडन) 10) विद्यारंभ 11) उपनयन ( जान्हवे घालणे) 12) वेदारंभ ( गुरुकुल शिक्षण ) 13) केशोनयन ( दाढी ) 14) समवर्तन ( अभ्यास संपवणे ) 15) विवाह 16) अंत्येष्टि ( अंतिम संस्कार)

## वैदिक कालीन आर्थिक जीवन :

- पशुपालन हा मुख्य व्यवसाय शेती हा दुय्यम व्यवसाय .( उत्तर वैदिक काळात शेती हा प्रमुख व्यवसाय बनला. ) गाईच्या नावावरून अनेक नावे. 1) गोपती ( राजा) 2) गावीष्ठि ( युद्ध) 3) गोमत ( श्रीमंत ) 4) गोधुली ( वेळ )
- शेती विशेष करून पावसाच्या पाण्यावर. बैलाचा वापर मशागती साठी .
- व्यापार करण्यासाठी गायींचा वापर चलन म्हणून व्हायचा. तसेच निष्क नावाचे चलन वापरले जाई. बहुतेक व्यापार खुश्कीच्या मार्गाने पण सागरी व्यापार माहीत असावा.

ऋग्वेदमध्ये सुतार, सोनार, लोहार, विणकर, चांभार, कुंभार, वैद्य यांचा उल्लेख आढळून येतो .कोणताही व्यवसाय निम्न नसावा . कारागीर समाजव्यवस्थे चे महत्त्वा चे घटक होते. 'श्रेणी' या नावाने ओळखले जाणारे त्यां चेस्वतंत्र संघ होते. अशा श्रेणींच्या प्रमुखाला श्रेष्ठी म्हणत असत.

**अनार्य:**

अनार्य : आर्य संस्कृती व यज्ञयाग न मानणारे. यांनाच दस्यु म्हणत.
आर्या मध्ये संघर्ष होत असे. पराभूत आर्य व अनार्य यामध्ये टोळ्या तयार झाल्या. त्यामधे भरत, पुईस, अनू, द्रशयू, यदू , तुर्वष ह्या होत. यात भरत टोळी सर्वात प्रभावी होती. सुदास हा भरत टोळीचा राजा व वशिष्ठ हा पूरोहित होता. यांचे विरोधात विश्वामित्र याने दहा राजांचा शत्रू संघ तयार केला. त्या युद्धाला दाशराज्ञ युद्ध म्हणतात. यामध्ये सुदास चा विजय झाला. ऋग्वेदाच्या मंडल 7 मध्ये याचा उल्लेख आढळतो. हे युद्ध पुरुष्णी नदीवर झाले.

**उत्तर वैदिक कालखंड: ( इ. स. पू. 1000 ते इ.स. पू. 500)**

- या काळात ब्राह्मण गटाचे महत्व कमी झाले. क्षत्रियांचे महत्व वाढले
- स्त्रीयांचे स्थान अधिक दुय्यम बनले. राजकीय सहभाग घेण्यास बंदी. संपत्ती मध्ये अधिकार राहिला नाही. मुलीचा जन्म दरिद्रयचे प्रतीक मानला गेला.
- वर्ण व्यवस्था कठोर बनली. वर्ण जन्मावरून ठरू लागले. शुद्रांची अवस्था वाईट झाली.
- आश्रम व्यवस्था अस्तीत्वात आली.
- विदथ व सभा नाहीशा झाल्या.